31-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/30/2025 10:33 PM Page 1



## निवडक

### सुनील शिरोडकर यांच्या चित्रकृतीचे आज प्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ३०** : गोमंतकीय प्रतिभाशाली चित्रकार सुनील लिंगू शिरोडकर यांच्या 'रिब्स' या मिश्र माध्यमातील चित्रकृतीला, पर्यटन खाते तेलंगणा सरकारच्या सहाव्या अखिल भारतीय कला स्पर्धा व प्रदर्शनात पुरस्कार प्राप्त झाला आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन दि. ३१ रोजी मधापूर हैद्राबाद येथील शासनाच्या राज्य कला दालनात होणार आहे व दि. ९ जून रोजी प्रदर्शनाच्या समारोप सोहळ्यात पुरस्कार व प्रशस्तीपत्र वितरण केले जाणार आहे.

सुनील लिंगू शिरोडकर यांनी कला विद्यालयात किंवा कला महाविद्यालयात जाऊन चित्रकलेचे शिक्षण घेतले नाही पण जल्लजात चित्रकलेची आवड व विल्सन डिसोझा आणि हैद्राबादच्या सरोजिनी नायडू आर्ट स्कूल मधून पदव्युत्तर पदवी घेतलेले शैलेश दाभोलकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांनी चित्रकलेत प्राविण्य मिळवले. २०२१ पासून २०२५ पर्यंत सलग चार वर्षे त्यांच्या चित्रकृती कला अकादमी आयोजित गोवा राज्य कला प्रदर्शनात निवडल्या गेल्या आहेत.८९ व्या अखिल भारतीय कला प्रदर्शनासाठी २०२४ साली त्यांची निवड झाली होती.

---

### डॉ. फ्रान्सिस्को लुईस गोम्स यांची आज जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३०** : मुसळधार पावसामुळे, नावेली येथील पर्पेच्युअल सुकूर कॉन्व्हेंट हायस्कूलसमोरील डॉ. फ्रान्सिस्को लुईस गोम्स ट्रस्ट मैदान आणि आजूबाजूला पाणी साचल्याने, शनिवार दि. ३१ रोजी सकाळी १० वाजता या ठिकाणी स्व. डॉ. फ्रान्सिस्को लुईस गोम्स यांचा जयंती कार्यक्रम होणार होता परंतु पाणी साचल्याने डॉ. फ्रान्सिस्को लुईस गोम्स यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केल्यानंतर तो कार्यक्रम नावेली येथील रोझरी हायस्कूलच्या सभागृहात होणार आहे.

---

### कराटे स्पर्धेत विष्णू नाईक संघ प्रथम




**साखळी : ओकिनावा इन्विटेशनल कराटे स्पर्धेचे विजेतेपद स्वीकारताना विष्णू नाईक व विद्यार्थी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ३०** : कराटे मुख्य प्रशिक्षक विष्णू नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ओकिनावा इन्विटेशनल कराटे स्पर्धेत तिसऱ्यांदा सर्वोत्कृष्ठ संघाचा मान मिळविला. स्पर्धा फोंडा येथील इनडोअर स्टेडियमवर आयोजित करण्यात आली होती. बक्षीस वितरण समारंभाला व्ही.पी.के.चे चेअरमन दुर्गादास गावडे, व्ही. पी. के.चे संचालक हेमंत गावडे, मुख्य प्रशिक्षक मोहमद पाशा व इतर मुख्य प्रशिक्षक उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक मुख्य मुख्य प्रशिक्षक विष्णू नाईक (होंडा-सत्तरी) यांच्या संघाला, द्वितीय क्रमांक रमाकांत गावकर (शिरोडा फोंडा) यांच्या संघाला,तृतीय क्रमांक सुरेखा कुंकळीकर (कुंकळे म्हार्दोळ) यांच्या संघाला व चौथा क्रमांक मनुराय नाईक (बोर्ये फोंडा) यांच्या संघाला प्राप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनुराय नाईक यांनी केले. तर व आभार प्रदर्शन विष्णू नाईक यांनी केले.

# आरसीबीची फायनलमध्ये धडक

## पंजाबवर एकतर्फी विजय | पंजाबला धूळ चारत फायनलमध्ये

**मुल्लांपूर, दि. ३०** :

इंडियन प्रीमियर लीग २०२५चा पहिला फायनलिस्ट संघ भेटला आहे. पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीच्या संघाने पंजाब किंग्सला सहज हरवत आयपीएलच्या फायनलमध्ये धडक मारली आहे. आरसीबीला विजयासाठी १०२ धावांची गरज होती. आरसीबीने हे आव्हान ८ विकेट राखताना पूर्ण केले आणि जबरदस्त विजय मिळवला आहे.

याआधी आरसीबीच्या गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यामुळे पंजाबचा संपूर्ण संघ १०१ धावांवर परतला आहे. क्वालिफायरच्या पहिल्या सामन्यात पंजाबला केवळ १०१ धावाच करता आल्या. आरसीबीला या सामन्यात विजय मिळवण्यासाठी १०२ धावा हव्या होत्या. फिल साल्टच्या जबरदस्त अर्धशतकी खेळीच्या जोरावर आरसीबीने हे आव्हान ८ विकेट राखत फायनल गाठली आहे.




पहिल्यांदा फलंदाजीस उतरलेल्या पंजाब किंग्सची सुरुवात खराब राहिली. त्यांनी पॉवर प्लेमध्ये चार विकेट गमावले. त्यांचा पहिला विकेट दुसऱ्याच षटकांत पडला. यश दयालने प्रियांश आर्यला बाद केले. त्यानंतर भुवनेश्वर कुमारने दुसरा सलामीवीर प्रभसिमरन सिंहला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर जोश हेझलवूडने आपल्या पहिल्याच षटकात श्रेयस अय्यरलाही स्वस्तात तंबूत पाठवले. पॉवरप्लेमध्ये पंजाबला आणखी एक झटका बसला तो जोश इंग्लिशच्या रूपात. तो ४ धावा करून बाद झाला. जोश इंग्लीश बाद झाल्यानंतर पंजाबची धावसंख्या ५.१ षटकांत ४ बाद ३८ होती. त्यानंतरही पंजाबचे एकामागोमाग एक विकेट पडत होते. वेगवान गोलंदाजांचा कहर झाल्यानंतर स्पिनर सुयशने कमाल केली. त्याने आपल्या एकाच षटकांत पंजाबच्या दोन फलंदाजांना तंबूत धाडले. यामुळे पंजाबचा संघ आणखी कमकुवत झाला.

पंजाब किंग्सचा संघ पॉईंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानावर आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू दुसऱ्या स्थानावर आहे. या सामन्यात विजेता सरळ फायनलमध्ये पोहोचेल.

# आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये अविनाशने इतिहास रचला






**नवी दिल्ली, दि. ३०** :

भारतीय धावपटू अविनाश साबळेने गुरुवारी आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ मध्ये पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. त्याने ८:२०.९२ सेकंद वेळ नोंदवत ३६ वर्षांनंतर भारताला या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून दिले. दक्षिण कोरियातील गुमी येथे आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ सुरू आहे.

भारताने या स्पर्धेत शेवटचे सुवर्णपदक १९८९ मध्ये जिंकले होते, तेव्हा दिना रामने ही कामगिरी केली होती. १९७५ मध्ये, हरबहाल सिंग स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला. दक्षिण

- **३६ वर्षांनंतर भारताला ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक**
- **पदकतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर**

कोरियातील गुमी येथे झालेल्या अजिंक्यपद स्पर्धेत विजय मिळवल्यानंतर साबळे म्हणाला, या प्रदेशात मी सर्वोत्तम असल्याने मला सुवर्णपदक जिंकण्याचा आत्मविश्वास होता.

**ज्योती याराजीला सुवर्णपदक**

ज्योती याराजीने १०० मीटर अडथळा शर्यत फक्त १२.९६ सेकंदात पूर्ण करून सुवर्णपदक जिंकले. ज्योतीचा मागील विक्रम १२.९९ सेकंदांचा होता. २६ व्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताने आतापर्यंत वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये १४ पदके जिंकली आहेत. पॉइंट्स टेबलमध्ये देश दुसऱ्या स्थानावर आहे. भारताने ५ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्यपदके जिंकली आहेत. यापूर्वी २०२३ च्या हंगामातही भारताने ४४०० मीटर मिश्र रिलेमध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

मंगळवारी राष्ट्रीय विक्रमधारक गुलवीर सिंगने १०,००० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताचे हे पहिले सुवर्णपदक होते. पूजाने महिलांच्या १५०० मीटर शर्यतीत ४ मिनिटे १० सेकंद वेळेसह आणखी एक रौप्य पदक जिंकले. तर दिल्लीची लिली दास या शर्यतीत चौथ्या स्थानावर राहिली. चीनच्या ली चुनहुईने सुवर्णपदक जिंकले.

# ऋतुराज-ईशान किशन संघाबाहेर; करुण नायरची एन्ट्री

**नवी दिल्ली, दि. ३०** :

आयपीएल २०२५ चा थरार संपण्याआधी इंग्लंडमध्येही भारतीय खेळाडूंची परीक्षा सुरू झाली आहे. भारत-इंग्लंड कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी दोन्ही देशांमध्ये 'सराव मालिका' खेळली जात आहे. इंडिया अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यातील २ प्रथम श्रेणी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना शुक्रवारी इंग्लंडमधील कॅन्टरबरी येथे सुरू झाला. इंग्लंड लायन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचा कर्णधार अभिमन्यू ईश्वरन आहे आणि त्याने संघाबाबत काही महत्त्वाचे निर्णय घेतले.

अभिमन्यू ईश्वरनने पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात ऋतुराज गायकवाड आणि इशान किशन सारख्या स्टार खेळाडूंना मैदानात उतरवले नाही. त्याने प्लेइंग-११ मध्ये खलील अहमद, आकाश दीप, मानव सुथार, तनुश कोटियन आणि तुषार देशपांडे यांनाही समाविष्ट केले नाही. दुखापतीमुळे आयपीएल २०२५ मध्ये ऋतुराज फक्त ५ सामने खेळू शकला. या काळात त्याने १२२ धावा केल्या. दुसरीकडे, इशान किशनने १४ सामन्यांमध्ये ३५७ धावा केल्या.

हा सामना केवळ २० जूनपासून सुरू होणाऱ्या भारताच्या मुख्य कसोटी दौऱ्यासाठीचा सराव सामना नाही, तर अनेक खेळाडूंना त्यांची क्षमता दाखवून वरिष्ठ संघात स्थान मिळवण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे. दरम्यान, दोन खेळाडूंना पदार्पण करण्याची संधी मिळाली. या सामन्यासह वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजने इंडिया अ संघाकडून पदार्पण केले. हरियाणा संघाकडून खेळणारा वेगवान गोलंदाज अंशुलने आतापर्यंत २२ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने ७४ विकेट्स घेतल्या आहेत. गेल्या वर्षी एका डावात १० विकेट्स घेत त्याने खळबळ उडवून दिली.त्याशिवाय, युवा डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबेनेही या सामन्यासह इंडिया अ संघाकडून पदार्पण केले. विदर्भाच्या या पठ्ठ्याने १८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ९% विकेट्स घेतल्या आहेत. हर्षने गेल्या रणजी ट्रॉफी हंगामात ६९ विकेट्स घेऊन इतिहास रचला. तो रणजी ट्रॉफीच्या इतिहासात एका हंगामात सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनला. अलीकडेच, आयपीएलमध्ये पदार्पण करताना त्याने सनरायझर्स हैदराबाद संघाकडून विराट कोहलीची विकेट्स घेतली होती.

भारतीय अ संघाची प्लेइंग-११ : अभिमन्यू इसवरन (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, करुण नायर, सर्फराज खान, ध्रुव जुरेल, नितीश कुमार रेड्डी, शार्दुल ठाकूर, हर्ष दुबे, अंशुल कंबोज, हर्षित राणा, मुकेश कुमार.

इंग्लंड लायन्स संघाची प्लेइंग ११ : टॉम हेन्स, बेन मॅककिनी, एमिलियो गे, मॅक्स होल्डन, जेम्स र्यू, डॅन मौसली, रेहान अहमद, जमान अख्तर, एडी जॅक, जोश हल, अजित डेल.

# इंग्लंडचा वेस्ट इंडिजवर विजय

## बेथेलने ८५ धावा केल्या आणि १ विकेट घेतली

**नवी दिल्ली, दि. ३०** :

पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडने वेस्ट इंडिजवर २३८ धावांनी विजय मिळवला. यासह त्यांनी तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. एकदिवसीय इतिहासात धावांच्या फरकाने इंग्लंडचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे.

गुरुवारी बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत ८ गडी गमावून ४०० धावा केल्या. प्रत्युत्तरात, वेस्ट इंडिजचा संघ १६२ धावांवर गारद झाला. मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना रविवारी कार्डिफमध्ये खेळला जाईल.

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ४०० धावा केल्या, जो वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावरील एकदिवसीय सामन्यातील त्यांचा सर्वोत्तम धावसंख्या होता. इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू जेकब बेथेलला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. बेथेलने ८२ धावा केल्यानंतर एक विकेट घेतली. चार इंग्लिश फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. सलामीवीर बेन डकेट (६०), जो रूट (५७) आणि कर्णधार हॅरी ब्रुक (५८) यांनी प्रभावी खेळी केल्या. इंग्लंडच्या सात फलंदाजांनी ३० पेक्षा जास्त धावा केल्या.




लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचा संघ १६२ धावांवर सर्वबाद झाला. ४०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची सुरुवात खूपच खराब झाली. त्यांचे दोन्ही सलामीवीर १७ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले. केसी कार्टी (२२) आणि कर्णधार शाई होप (२५) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला पण त्यांना अपयश आले. शेवटी फलंदाजी करण्यासाठी आलेला जेडेन सील्स (२९*) संघाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. इंग्लंडकडून साकिब महमूद आणि जेमी ओव्हरटन यांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. आदिल रशीदने दोन बळी घेतले. ब्रायडन कार्स आणि जेकब बेथेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# मुशीर खानने रचला इतिहास



**नवी दिल्ली, दि. ३०** :

आयपीएल २०२५ च्या क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्जचा ८ विकेट्सने पराभव झाला. तथापि, पंजाबसाठी अजूनही संधी आहे. क्वालिफायर २ जिंकून पंजाब किंग्ज अंतिम फेरीत पोहोचू शकतात. आरसीबी विरुद्ध क्वालिफायर १ मध्ये मुशीर खान या हंगामात पहिल्यांदाच पंजाब किंग्जकडून खेळला. तो त्याच्या पहिल्या आयपीएल सामन्यात एकही विकेट न घेता बाद झाला, तरीही त्याच्या नावावर एक विशेष कामगिरी नोंदवली गेली. आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात पंजाब किंग्जने मुशीर खानला ३० लाख रुपयांना खरेदी केले.

या सामन्यात पंजाब किंग्जची फलंदाजी खूपच खराब होती. त्यामुळे संघ फक्त १०१ धावांवर बाद झाला. पंजाबने ६० धावांच्या आत त्यांच्या ६ विकेट गमावल्या होत्या, त्यासाठी पंजाबला संघासाठी काही धावा काढू शकणाऱ्या फलंदाजाची आवश्यकता होती, म्हणून पंजाब किंग्जने मुशीर खानचा प्रभावशाली खेळाडू म्हणून वापर केला. मुशीर खानच्या आयपीएल कारकिर्दीतील हा पहिला सामना होता आणि त्याच्या पहिल्याच सामन्यात मुशीर एकदाही फलंदाजी न करता बाद झाला.

मुशीर खान आता प्लेऑफ सामन्यात पदार्पण करणारा टी-२० इतिहासातील पहिला खेळाडू बनला आहे, परंतु आयपीएलच्या इतिहासातील तो दुसरा खेळाडू बनला आहे. आरसीबीविरुद्ध, मुशीरने गोलंदाजी करतेवेळी एक धाव घेतली. त्याने मयंक अग्रवालला बाद केले. मुशीरच्या कारकिर्दीतील हा पहिला टी-२० सामना होता, त्याने यापूर्वी कधीही प्रथम श्रेणी सामना खेळला नव्हता. २०१२ मध्ये आयपीएलमधील पहिल्या प्लेऑफ सामन्यात सनी गुप्ताने दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून पदार्पण केले. महत्वाची गोष्ट ही आहे कि त्या सामन्यात सनी देखील फलंदाजी न करता बाद झाला होता, पण गोलंदाजी करताना त्याने १ विकेट घेतली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २६८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 268 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .